**मॉडर्न एज्युकेशन सोसायटचे नौरोसजी वाडिया कॉलेज ,पुणे**
**निर्भय कन्या अभियान अहवाल 2022-23**

**Name of the Event: Workshop on Nirbhay Kanya Abhiyaan**

**Date of Event: 15th November 2022**

**Location of the Event: Nowrosjee Wadia College, Pune, Maharashtra**

**No. of girls participants attended: 193**

**Organised and sanctioned by: Board of Student's Development,**

**SPPU and Nowrosjee Wadia College, Pune**

## नौरोसजी वाडिया महाविद्यलयात निर्भय कन्या अभियाना अंतर्गत विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्या सहकार्याने नौरोसजी वाडिया महाविद्यलयात विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना व अंतर्गत तक्रार निवारण समिती यांच्या संयोगाने निर्भय कन्या अभियान या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठगीताने झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे विद्यार्थी विकास आधिकारी डॉ.व्ही. टी. बोरकर यांनी केले. कार्यक्रमाची रूपरेषा 'अंतर्गत तक्रार निवारण समिती' समन्वयक प्रा. डॉ.मंजुषा मुसमाडे यांनी सादर केली. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. व्ही. व्ही. चाबुकस्वार यांनी विद्यार्थिनींना निर्भीड होवून आत्मनिर्भर होण्याचा सल्ला दिला.

या कार्यक्रमासाठी श्री. भूषण कातकर व डॉ. प्रज्ञा रोटीथोर या दोन तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन व समोपदेशन विद्यार्थिनींना मिळाले. श्री. भूषण कातकर यांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व मुलींना पटवून दिले. डॉ. प्रज्ञा रोटीथोर यांनी महिलांच्या आरोग्या विषयक समस्या व त्यावरील उपाय सांगून मुलींचे आरोग्यविषयक शंकाचे निरसन केले.

त्यानंतर 'सक्षम स्त्री कशी असावी आणि एकूण स्त्री सुरक्षेवर पथनाट्य सादर झाले. आता पर्यंत या समाजात् स्त्रीला कोणकोणत्या समस्यांना सामोरे जावे लागले आहे, आणि त्यातूनही ती कसा मार्ग काढते आणि सक्षम बनते हे सर्व या पथनाट्यात

होते. साक्षी सिंग हिने हा पथनाट्याचे दिग्दर्शन केले होते. पथनाट्यानंतर सर्व सहभागींना नाश्ता देण्यात आला.

दुपारच्या सत्रात श्री. सौरभ खोतकर व त्यांची सहकारी ऐश्वर्या पांगुल यांनी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींना, महिला शिक्षक व शिक्षकेतर महिलांना स्वसंरक्षण प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षकांनी तायकांदो, कराटे यांचे पायाभूत प्रशिक्षण मुलींना दिले. दहा दहा मुलेंचे गट करून त्यांनी मुलींना स्वयं सुरक्षतेचे प्रात्यक्षिके करून घेतली.

या कार्यशाळेचे आभार प्रदर्शन 'अंतर्गत तक्रार निवारण समिती' सदस्य डॉ.ज्योति अनिरुद्ध व राष्ट्रीय सेवा योजना,कार्यक्रम अधिकारी डॉ.सोमनाथ वाघमारे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. सभागृह सोडण्यापूर्वी सर्व विद्यार्थिनींना सनिटरी नॅप्किनचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. व्ही. व्ही. चाबुकस्वार, उपप्राचार्या डॉ. समिना बॉक्सवाला काळे, उपप्राचार्य डॉ. भरत बहुले, उपप्राचार्य प्रा. अशोक मुंढे, 'अंतर्गत तक्रार निवारण समिती' समन्वयक प्रा. डॉ.मंजुषा मुसमाडे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. सोमनाथ वाघमारे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विठ्ठल बोरकर, लुईस ब्रेल रायटर क्लब समन्वक नीरज भगत, मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ. वसंत बोरकर, लेफ्टनंट कमांडर प्रा. प्रमोद शिंदे , प्रबंधक राजेंद्र तागडे आदी मान्यवर उपस्थितीत होते. या कार्यक्रमासाठी संस्थेचे विश्वस्थ प्रा. सचिन सानप, डॉ. मनोहर सानप, डॉ. अशोक चांडक यांचे विशेष सहकार्य लाभले.

| | |
|---|---|
| Dr. V. T. Borkar | Prof.Dr.V.V.Chabukswar |
| S.D.O | I/C Principal |
| Nowrosjee Wadia College | Nowrosjee Wadia College |